# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:15.01.2026** **वार:गुरुवार**

---

1. पंतप्रधानांच्या हस्ते राष्ट्रकुल देशांच्या सभापती आणि पीठासीन अधिकाऱ्यांच्या 28 व्या परिषदेचे आज उद्घाटन
2. महाराष्ट्रातील 29 महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदानाला आरंभ.
3. अरवली पर्वतरांगांमधील 97 किलोमीटरचे महसूल क्षेत्र कायमस्वरूपी संरक्षित वनक्षेत्र म्हणून केंद्राची घोषणा.
4. इराणमधील आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर, केंद्रसरकारकडून भारतीय नागरिकांसाठी सावधगिरी बाळगण्याचा सल्ला आणि
5. अमेरिकेकडून पाकिस्तान आणि बांग्लादेशसह 75 देशांतल्या स्थलांतरितांच्या व्हिसा प्रक्रियेला स्थगिती.

**राष्ट्रकुल सभापती**

दिल्लीत आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राष्ट्रकुल देशांच्या सभापती आणि पीठासीन अधिकाऱ्यांच्या 28 व्या परिषदेचे उद्घाटन होणार आहे. या परिषदेमध्ये,42 राष्ट्रकुल राष्ट्रांचे 61 अध्यक्ष, पीठासीन अधिकाऱ्यांसह, चार अर्ध स्वायत्त देशांचे संसद अध्यक्षही सामील होणार आहेत. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला या परिषदेच्या अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. समाजमाध्यमांवर लिहिलेल्या संदेशात, संसदीय लोकशाही बळकट आणि अधिक प्रभावी करण्याच्या उद्दीष्टाला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक प्रगत संवाद, नवोन्मेष आणि सहकार्यासाठी ही परिषद मुख्य जागतिक मंच म्हणून काम करेल असे, ओम बिर्ला यांनी नमूद केले आहे.

**पंतप्रधान पोंगल**

उत्तरायणाच्या प्रारंभी, पंतप्रधान नरेंद्र मोदी काल माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉक्टर डी. एल. मुरूगन यांच्या शासकीय निवासस्थानी आयोजित पोंगल समारंभात उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना त्यांनी, भावी पिढ्यांसाठी मातीचा कस राखणे, जलसंवर्धन आणि संसाधनांचा न्याय वापर करण्याची गरज व्यक्त केली. मिशन लाईफ, एक पेड मां के नाम आणि अमृत सरोवर सारख्या उपक्रम याच उद्दीष्टांनी सुरू करण्यात आले आहेत. पृथ्वीने आपल्याला इतके स्त्रोत दिल्यानंतर त्यांचे जतन ही आपलीच जबाबदारी आहे. देशातील शेती शाश्वत आणि पर्यावरणपूरक व्हावी यासाठी सरकार सातत्यपूर्ण काम करत असल्याचे ते म्हणाले. येत्या काळात, शाश्वत शेती, जलव्यवस्थापन, पाण्याच्या प्रत्येक थेंबासह अधिक पीक, नैसर्गिक शेती, शेतीतंत्रज्ञान आणि मूल्यवर्धित शेती हे सर्व महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचं निरीक्षण मोदी यांनी नोंदवलं.

**संरक्षण माजी सैनिक**

सशस्त्र दलातील माजी सैनिक हे राष्ट्रीय जाणीवेचे जिवंत आधारस्तंभ, सामूहिक धैर्याचे प्रतीक आणि भावी पिढ्यांसाठी प्रेरणास्रोत असल्याचे प्रतिपादन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी काल केले. सशस्त्र दलाच्या माजी सैनिक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला संबोधित करताना सिंह बोलत होते. माजी सैनिक राष्ट्रनिर्माणाच्या प्रत्येक आघाडीवर योगदान देतात, शिस्त, नेतृत्व आणि धैर्य या गुणांसह ते समाजाला मार्गदर्शन करतात. माजी सैनिकांच्या गणवेशाचा रंग आणि कामाचे ठिकाण बदलले तरीही देशभक्ती आणि सेवाभावात किंचितही बदल होत नसल्याचे त्यांनी नमूद केले.

**राष्ट्रपती मुर्मू**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून पंजाब आणि राजस्थानच्या दौऱ्यावर जात आहेत. अमृतसर इथं गुरू नानकदेव विद्यापीठाच्या 50व्या वार्षिक पदवीदान समारंभाला त्या उपस्थित राहाणार आहेत. तर उद्या, जालंधरमधील डॉ. बी. आर. आंबेडकर राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेच्या पदवीदान समारंभाला तसेच रामानंद मिशनच्या महायज्ञाला उपस्थित राहाणार आहेत.

**महाराष्ट्र निवडणूक**

महाराष्ट्रातील 29 महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आज मतदानाला सकाळी साडेसात वाजता सुरुवात झाली आहे. एकंदर 2 हजार 869 जागांसाठी ही निवडणूक होत असून 3 कोटी 48 लाखांपेक्षा जास्त मतदारांकरिता 39 हजार 92 मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. निवडणूक रिंगणात 15 हजार 908 उमेदवार आहेत. महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये मोठ्या संख्येनं मतदान करून

आपणही आपल्या शहरांच्या-महानगरांच्या जडणघडणीत योगदान द्यावं आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रीय सहभाग नोंदवावा असं आवाहन महाराष्ट्राचे निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी केलं आहे.

**<u>अरावली पर्वत यादव</u>**

अरवली पर्वतरांगाच्या पर्यावरणीय संवर्धनासाठी सरकार कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्री भुपेंद्र यादव यांनी काल केला. अतिक्रमण आणि अवैध खाणकार रोखण्यासाठी अरावली पर्वतरांगांमधील एकंदर 97 किलोमीटर महसूल क्षेत्रातील जमिनीला कायमस्वरूपी संरक्षित वनक्षेत्र म्हणून घोषित करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दिल्लीत अरावली परिसराच्या पर्यावरणीय पुनर्संचयाशी निगडीत राष्ट्रीय परिषदेत बोलताना त्यांनी अरवली ग्रीन वॉल प्रकल्पांतर्गत जवळपास साडेसहा लाख हेक्टर पडीक जमीनीची ओळख पटवण्यात आली असल्याचे त्यांनी नमूद केले.

**<u>जपान एफएम</u>**

जपानचे परराष्ट्र मंत्री तोशीमित्सू मोटेगी आजपासून तीन दिवस भारताच्या दौऱ्यावर येत आहेत. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनानुसार, मोटेगी यांचे आज दिल्लीत आगमन होईल. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर उद्या त्यांची भेट घेणार आहेत. राज घाटावर जाऊन बापूजींना आदरांजली वाहिल्यानंतर मोटेगी दिल्ली मेट्रोमधून प्रवास करणार आहेत.

**<u>इराण सल्ला</u>**

इराणमधील ढासळती परिस्थिती आणि आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारकडून भारतीय नागरिकांसाठी सावधगिरी बाळगण्याचा सल्ला जारी केला आहे. भारतीय नागरिकांनी पुढील सूचना मिळेपर्यंत इराणचा प्रवास टाळण्याचा सल्ला देण्यात आला आहे. इराणमध्ये विद्यार्थी, पर्यटक, भाविक किंवा व्यावसायिक कोणत्याही प्रकारच्या नागरिकांनी उपलब्ध व्यावसायिक विमान उड्डाणे अथवा पूरक वाहातूक साधनांचा वापर करून भारतात परतावे. कोणत्याही गर्दीच्या ठिकाणांपासून तसेच निदर्शनांपासून दूर राहात सावधगिरी बाळगावी. तसेच तेहरानमधील भारतीय दूतावासाच्या सातत्याने संपर्कात राहावे. नागरिकांनी पारपत्रे, ओळखपत्रे आणि इमिग्रेशन कागदपत्रे सदैव जवळ बाळगावेत असाही सल्ला दिला आहे. ज्या नागरिकांनी अद्याप दूतावासाकडे आपली नोंदणी केलेली नाही, त्यांनी तत्काळ अधिकृत लिंकवर नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी असे भारतीय दूतावासाने कळवले असून आपत्कालीन मदतीसाठी भारतीय दूतावासाने खालील हेल्पलाईन क्रमांक आणि ईमेल जारी केले आहेत.

दरम्यान, परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी इराणचे समपदस्थ मंत्री सय्यद अराघची यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. जयशंकर यांनी समाजमाध्यमांवर लिहिलेल्या संदेशात, अराघची यांच्याकडून दूरध्वनी आल्यानंतर दोन्ही नेत्यांनी इराण आणि आसपासच्या क्षेत्रात विकसित होणाऱ्या परिस्थितीबाबत चर्चा केली.

दरम्यान, अमेरिकचे सैन्य असलेल्या शेजारी देशांनी अंतर्गत परिस्थिती हस्तक्षेप केल्यास इराण अमेरिकेच्या लष्करी तळांवर प्रतिहल्ला करेल. तेहरानने, अमेरिकेच्या मित्र राष्ट्रांना अमेरिकेने इराणवर हल्ला करण्यापासून रोखण्यास सांगितले आहे. या पार्श्वभुमीवर, अमेरिकेने आपल्या काही लष्करी कर्मचाऱ्यांना आज संध्याकाळपर्यंत कतारमधील अल उदेद हवाई तळावरून निघून जाण्याचा सल्ला दिला आहे.

**<u>अमेरिका-व्हिसा</u>**

अमेरिकेने पाकिस्तान आणि बांग्लादेशसह 75 देशांमधून येणाऱ्या स्थलांतरितांच्या व्हिसा प्रक्रियेला स्थगिती देण्याची घोषणा केली आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने जारी केलेल्या सूचनेत, स्थलांतरीत लोक अमेरिकेच्या स्थानिकांकडून अस्वीकाराहं दरांनी कल्याणकारी योजनांचा लाभ घेतात आणि अमेरिकेवर त्याचा आर्थिक भार पडत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. नवीन स्थलांतरितांकडून अमेरिकेला काही आर्थिक फायदा होत नाही तोपर्यंत स्थगिती कायम राहाणार असल्याचेही अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाने नमूद केले आहे.

**<u>कलकत्ता-उन्या</u>**

अखिल भारतीय तृणमूल काँग्रेसनं गोपनीय राजकीय माहिती संरक्षित करण्याची मागणी करण्यासाठी दाखल केलेली याचिका कलकत्ता उच्च न्यायालयानं काल निकाली काढली. सक्तवसुली संचालनालयानं आठ जानेवारीला आय-पॅक आणि प्रतीक जैन यांच्या कार्यालयांवर आणि निवासस्थानांवर केलेल्या छाप्यांदरम्यान ही गोपनीय राजकीय माहिती जप्त केली होती. आय-पॅकच्या जागेतून कोणतेही कागदपत्रं किंवा माहिती घेण्यात आलेली नाही असा दावा ईडीद्वारे न्यायालयात करण्यात आला. ईडीनं कोळसा घोटाळ्याच्या चौकशीच्या नावाखाली, आय-पॅकच्या संगणकांमधून आगामी राज्य विधानसभा निवडणुकीशी संबंधित महत्त्वपूर्ण राजकीय कागदपत्रे काढून घेतली आहेत असा आरोप तृणमूल काँग्रेसनं केला होता.

**<u>राजस्थान आर्मी-डे</u>**

राजस्थानमध्ये प्रथमच लष्करी छावणी परिसराच्या बाहेरील क्षेत्रामध्ये लष्कर दिनाच्या संचलनाचे आयोजन होत आहे. राजस्थानच्या उपमुख्यमंत्री दिया कुमारी यांनी याबाबत आनंद व्यक्त करताना राज्यासाठी हा ऐतिहासिक क्षण असल्याचे म्हटले आहे. जयपूरमधील जगतपुरा

भागातल्या महाल रस्ता भागात संचलन होणार असून, यामध्ये विविध प्रकारची शस्त्रे, लष्करी वाहने, ड्रोन आणि प्रगत संरक्षण प्रणाली प्रदर्शित केल्या जातील, ज्यामुळे नागरिकांना लष्कराची क्षमता जवळून पाहण्याची एक दुर्मिळ संधी मिळेल.

**महिला आयपीएल**

महिलांच्या प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धेत काल दिल्ली कॅपिटल्सने युपी वॉरिअर्स संघावर सात गडी राखून विजय मिळवला. 155 धावांचे लक्ष्य दिल्लीने 20 षटकांत तीन गडी गमावत 158 धावा केल्या. पुढील सामना आज मुंबई इंडियन्स आणि युपी वॉरिअर्स यांच्या संध्याकाळी होणार आहे.

**क्रिकेट**

डॅरिल मिशेलच्या नाबाद 131 धावांच्या खेळीमुळं न्यूझीलंडनं काल राजकोट इथं पन्नास षटकांच्या दुसऱ्या सामन्यात 285 धावांचं लक्ष्य अठ्ठेचाळिसाव्यात षटकांत पूर्ण करत भारतावर सात गडी राखून विजय मिळवला आणि तीन सामन्यांच्या मालिकेत 1-1 अशी बरोबरी साधली. डॅरिल मिशेलला सामनावीर ठरला. यजमान संघाकडून केएल राहुलनं सर्वाधिक 112 धावांची नाबाद खेळी केली. मालिकेतील अंतिम तिसरा सामना 18 तारखेला इंदूरमध्ये खेळला जाईल.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.